SHIKSHAN PRASARAK MANDAL

# TATYASAHEB MAHAJAN ARTS & COMMERCE COLLEGE,

CHIKHLI. DIST.BULDANA 443201
NAAC RE-ACCREDITED 'B' GRADE
AFFILIATED TO S.G.B.AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

COMMERCE & MANAGEMENT DEPTT.

**SURVEY REPORT**
**[2021-2022]**

# A STUDY ON SOCIO ECONOMIC CONDITION OF AUTO-RICKSHA DRIVERS CHIKHLI PRECINCT

**Submitted by-**
**B.COM FINAL YEAR STUDENTS**

UNDER THE SUPERVISION OF
**PROF.DR. ANIL S. PUROHIT**
MEMBER - FACULTY OF COMMERCE & MANAGEMENT
& Ph.D. SUPERVISOR
S.G.B.AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI




Scanned with OKEN Scanner

शिक्षण प्रसारक मंडळ

# तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली

जि. बुलडाणा

नॅकद्वारा 'बी' श्रेणीने पुनर्मूल्यांकित

वाणिज्य व व्यवस्थापन विभाग

## * सर्वेक्षण प्रकल्प अहवाल *

(२०२१-२०२२)

# चिखली परिसरातील ऑटो रिक्षा चालकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे अध्ययन

* सादरकर्ते *

**बी.कॉम. अंतिम वर्षाचे विद्यार्थी**

* मार्गदर्शक *


**प्रा. डॉ. अनिल स. पुरोहीत**

पीएच. डी., मार्गदर्शक तथा

सदस्य, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती





Scanned with OKEN Scanner

# चिखली परिसराचा नकाशा



## ऑटो रिक्षा असोसिएशन, चिखलीचे अध्यक्ष मा.संजयजी पैठणकर ,सदस्य  व विद्यार्थी








ऑटो रिक्षा असोसिएशन, चिखलीचे अध्यक्ष मा.संजयजी पैठणकर
यांचेकडून ऑटोरिक्षा चालकांची आर्थिक व सामाजिक माहिती घेतांना विद्यार्थी

Scanned with OKEN Scanner

## ॲटो रिक्षा असोसिएशन, चिखलीचे अध्यक्ष मा.संजयजी पैठणकर ,सदस्य  व विद्यार्थी









ॲटोरिक्षा असोसिएशन, चिखलीचे अध्यक्ष मा.संजयजी पैठणकर ,
प्रकल्प मार्गदर्शक प्रा.डॉ.अनिल एस.पुरोहित
व बी.कॉम फायनलचे विद्यार्थी

Scanned with OKEN Scanner

## अणुक्रमणिका :-


| अ.क्र. | विवरण | पान क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | सर्वेक्षण प्रकल्पात सहभागी विद्यार्थी यादी | १ |
| ०२ | प्रस्तावणा | २ |
| ०३ | चिखली शहराची पार्श्वभूमी | २ ते ४ |
| ०४ | सर्वेक्षण प्रकल्पाची उदिष्टये | ४ ते ५ |
| ०५ | ऑटोरिक्षा चालकांची निवड | ६ ते ६ |
| ०६ | ऑटोरिक्षा चालकांची सामान्य माहिती ( सामाजिक व आर्थिक ) | ६ ते १६ |
| ०७ | ऑटोरिक्षा असोसिएशन | १७ |
| ०८ | ऑटोरिक्षा व्यवसायासमोरील समस्या | १८ ते २० |
| ०९ | उपाय | २० ते २२ |
| १० | ऑटोरिक्षा चालकांच्या प्रतिक्रिया | २२ ते २३ |
| ११ | मुलाखतीचे फोटो व नकाशा | २४ ते २६ |
| १२ | प्रश्नावली | २७ ते ३० |


Scanned with OKEN Scanner

## तक्ता सूची :-


| अ.क्र. | तक्ता विवरण | पान क्रमांक |
| --- | --- | --- |
| ०१ | निवडलेल्या ऑटोरिक्षा चालकांची गावानुसार विभागणी | ७ |
| ०२ | निवडलेल्या ऑटोरिक्षा चालकांची वयानुसार विभागणी | ८ |
| ०३ | ऑटोरिक्षा चालकांची शैक्षणिक परिस्थीती | ९ |
| ०४ | ऑटोरिक्षा चालकांची वैवाहिक स्थिती | ११ |
| ०५ | ऑटोरिक्षांची मालकी दाखविणारा तक्ता | १२ |
| ०६ | ऑटोरिक्षा खरेदीसाठी दिलेली किंमत | १२ |
| ०७ | परगावी प्रवाशांची वाहतूक स्थिती | १३ |
| ०८ | ऑटोरिक्षा मध्ये प्रवास करणारे दरमाह बांधील ग्राहक | १४ |
| ०९ | नियमीत बचतीची स्थिती | १५ |
| १० | परवानाधारक ऑटोरिक्षा चालक | १६ |


Scanned with OKEN Scanner

## सर्वेक्षण प्रकल्पात सहभागी विद्यार्थी

शि.प्र.मं. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील बि.कॉम अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी चिखली परिसरातील ऑटोरिक्षाचालकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थीतीचे अध्ययन करण्यासाठी प्रश्नावलीसह चालकांच्या भेटी घेऊन हा सर्वेक्षण प्रकल्प पुर्ण केला. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | सहभागी विद्यार्थ्यांचे पुर्ण नांव | गावाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | कु. दिप्ती दिनेश वाणी | शेलुद |
| ०२ | कु. नेहा कैलास मुळावकर | डासाळा |
| ०३ | कु. नेहा अंकुश साळवे | पिंप्री आंधळी |
| ०४ | कु. कोमल सुरेश जाधव | भोगावती |
| ०५ | कु. सरला सुभाष थेटे | अंत्रीकोळी |
| ०६ | कु. अंकिता कैलास वाघमारे | चिखली |
| ०७ | कु. माया दिपक खरात | चिखली |
| ०८ | सखाराम युवराज थोरात | चिखली |
| ०९ | आकाश काशिनाथ देवकर | वरुड |
| १० | गाकुल राजु राठोड | पारडी |
| ११ | गोपाल प्रकाश गवारे | चिखली |
| १२ | संतोष प्रकाश केतकर | चिखली |

**प्रा. डॉ. अनिल स. पुरोहित**

**( मार्गदर्शक )**

Scanned with OKEN Scanner

# सर्वेक्षण प्रकल्प अहवाल :- २०२२

## चिखली परिसरातील ऑटो चालकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे अध्ययन

**प्रस्तावना :-**

शिक्षण प्रसारक मंडळ , तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना २० जून १९६५ रोजी करण्यात आली. तेव्हापासून आजतागायत हे महाविद्यालय कला व वाणिज्य शाखेत पदवी पर्यंतचे शिक्षण देत आहे. त्यामुळे या परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय झालेली आहे.

महाविद्यालयात दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदाव्यात , त्यांना अधिक उपक्रमशील बनवावे , त्यांची जिज्ञासा जागृत व्हावी व ती पूर्ण व्हावी हा त्यामागे हेतू असतो. अशाच उपक्रमाचा एक भाग म्हणून महाविद्यालयात प्रारंभापासूनच वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यास मंडळाव्दारे दरवर्षी निरनिराळया शैक्षणिक , आर्थिक व सामाजिक विषयांशी संबधीत विषयांवर नमुना पहाणी स्वरुपात सर्वेक्षणाचे कार्य ( Sample Survey ) विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून केले जाते. यामध्ये बँक प्रशिक्षण , औदयोगिक स्थळांना भेटी व इंटर्नशिप कार्यक्रम तसेच विद्यार्थी संशोधन कार्यशाळा इत्यादींचा समावेश आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्वेक्षणाचे कार्य कसे केले जाते हे समजावे व त्यांनी काही प्रात्याक्षिक स्वरुपाचा अनुभव व्हावा हा त्यामागे उद्देश आहे.

**चिखली शहराची पार्श्वभूमी :-**

चिखली हे शहर तालुक्याचे ठिकाण आहे. चिखली हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील बुलडाणा जिल्ह्याचा एक तालुका आहे. चिखली तालुक्यातील हे चिखली नावाचे गांव जालना - खामगांव या महामार्गावर आहे. बुलडाणा जिल्ह्यातील चिखली हे शहर पूर्वी इंग्रजांचा गड समजल्या जायचे, येथे इंग्रजांनी मोठमोठया तेल गिरण्या , कापूस जिनींग , वस्त्रोद्योग निर्मिती , सरकारी कामकाजाचे व्यवस्थापन करुन स्थापन करुन ठेवलेल्या होत्या.आज त्यावेळच्या परिस्थितीत आमूलाग्र बदल झालेला आहे. चिखली शहर हे सध्याच्या पुणे - नागपूर ह्या हाय वे ला जोडलेले असून महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथून केवळ ५५० कि. मी. अंतरावर आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील जास्त लोकवस्ती असलेले शहर व सर्वात मोठया तालुक्याचे

Scanned with OKEN Scanner

ठिकाण आहे. चिखली येथून जिल्ह्याचे ठिकाण असलेले बुलडाणा केवळ २५ किलोमिटर अंतरावर आहे. चिखली शहरात जिनींग फॅक्ट्री व एम.आय.डि.सी. परिसरात लहान मोठे उदयोग असल्यामुळे कामाच्या व रोजगाराच्या निमित्ताने परीसरातील लोक नियमीत येत जात असतात. चिखली शहराची २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ७८,४२८ एवढी होती तर २०२१ पर्यंत १,४७,८९६ एवढी झालेली आहे. लोकसंखेच्या साक्षरतेचे प्रमाण हे सरासरी ७४ % असून शिक्षणासाठी भरपूर प्रमाणात शाळा उपलब्ध आहेत. तसेच परिसरातील सर्व व्यवहार हे मराठी भाषेतच होत असतात.

चिखली शहर हे महाराष्ट्रातील महत्वाच्या शहरांशी जोडलेले आहे त्यात स्टेट हाय वे २४ बैतुल ( मध्यप्रदेश ) ते चांदवड ( नाशिक ) आणि स्टेट हाय वे १७६ (मलकापूर -सोलापूर) आणि नॅशनल हायवे ७५३ A ( बुलडाणा ते शिर्डी ) चा समावेश आहे. रेल्वे सुविधा उपलब्ध नसून रेल्वे ने प्रवास करण्यासाठी जवळचे स्टेशन म्हणून मलकापूर - ७२ कि.मी. व शेगांव - ६५ कि.मी. अंतरा पर्यंतचा प्रवास करावा लागतो. त्याचबरोबर जालना रेल्वे स्टेशन हे ८५ कि.मी. अंतरावर उपलब्ध आहे.

चिखली हे शहर शिक्षणासाठी बुलडाणा जिल्ह्यात प्रसिध्द आहे. शहरात आदर्श विद्यालय , श्री शिवाजी विद्यालय सारख्या माध्यमिक शिक्षण देणा-या उच्च दर्जाच्या शाळा उपलब्ध असून कला व वाणिज्य , औषधनिर्माण शास्त्र , तंत्रनिकेतन , अभियांत्रिकी महाविद्यालयासारखे उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय तसेच आयुर्वेद महाविद्यालय व इंग्रजी भाषेतून शिक्षण देणाऱ्या दर्जेदार संस्था उपलब्ध आहेत. यातून दरवर्षी हजारो विद्यार्थी शाळा - महाविद्यालयीन तसेच व्यावसायिक शिक्षण घेत आहेत.

चिखली शहर हे ऐतिहासिक शहर आहे. शहरात दैवत म्हणून प्रसिध्द असलेले श्री रेणुका मातेचे भव्य मंदीर आहे. चैत्र पौर्णिमेला हजारोंच्या संख्येने भाविक यात्रेमध्ये सहभागी होत असतात. शहराला लागून असलेल्या कव्हळा या गावी पांडवांचे देऊळ आहे. शहरात शिवजयंती , हनुमान जयंती , रामनवमी , नवरात्री , गणपती उत्सव इत्यादि नियमितपणे भव्यदिव्यपणे उत्साहात साजरे करण्यात येतात. खामगांव रोडवर प्रसिध्द असे पंचमुखी महादेव मंदीर , जालना रोडवर सिध्द मंदिर ,शहराला लागून असलेले रोहडा या गावी रेणुका माता ( तपोवन ) संस्थान , साकेगांव येथे महादेवाचे प्राचीन हेमाडपंथी मंदिर , तसेच अन्य महत्वाची धार्मिक स्थळे असून दररोज भाविक दर्शनासाठी नेहमी ये जा करीत असतात. सैलानी बाबा यात्रा निमित्तानेसुध्दा चिखली शहरात बरीच वर्दळ असते.

चिखली शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे शहरात सुविधायुक्त भव्य असे शासकिय रुग्णालय असून परिसरातील रुग्ण नियमीतपणे उपचार घेण्यासाठी रुग्णालयास

Scanned with OKEN Scanner

भेट देत असतात. या शिवाय खाजगी दवाखाने अद्यावत असल्यामुळेसुध्दा जवळच्या मोठया शहरात उपचार घेण्याऐवजी चिखली शहरातील दवाखान्यातच परिसरातील लोक उपचार घेणे पसंत करतात. सांगायचे तात्पर्य ऐवढेच की , शिक्षण , व्यापार, रोजगार, पुजा - अर्चना तसेच मानवी गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने परिसरातील जनता या ना त्या कारणाने शहरात परिसरातून प्रवास करीत असतात. त्यामुळेच वाहतूकीच्या व्यवसायाकडे सर्व अगदी जिव्हाळयाने बघत असतात.

**उद्देश:-**

चिखली हे एक तहसिलचे ठिकाण आहे. साधारण चाळीस वर्षांपूर्वी या गावात एकही ऑटो रिक्षा नव्हती. काही तुरळक सायकलरिक्षा तेव्हडया होत्या.त्यानंतर विशेषत: गत काही वर्षात गावातील ऑटोरिक्षांची संख्या सतत वाढत गेली. आज परिसरात जवळपास ९०० ते १००० ऑटोरिक्षा आहेत. व ही संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. पुढेही ती वाढत जाणार आहे. गावाचा आवाका व गरज लक्षात घेता ही संख्या जास्त आहे. त्यामुळे या व्यवसायात प्रचंड स्पर्धा निर्माण झालेली आहे सुशिक्षीत बेरोजगारांची निरंतर वाढ होत आहे. नोकरीच्या संधी धूसर होत आहेत. त्यामुळे अनेक युवक या व्यवसायकडे ओढले जात आहेत. परिणामी हा व्यवसाय बिनकिफायतशिर बनलेला वाटतो. हा व्यवसाय करणारे बरेचसे व्यावसायिक , पर्याय नसल्यामुळेच या व्यवसायात ओढले जात आहेत. व नाईलाज म्हणून इच्छेविरुध्द हा व्यवसाय करीत असतील असा आमचा समज आहे. प्रचंड स्पर्धा ,प्रभावी संघटनेची अडचण , पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती ई. समस्यांमुळे हा व्यवसाय कारणारांची परिस्थिती यथातथाच असली पाहिजे.

या पार्श्वभूमीवरच सन २०२० -२१ मध्ये महाविद्यालयाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यास मंडळाने ‘ परिसरातील ऑटो रिक्षा चालकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे अध्ययन ’ या विषयावर नमुना पाहणी स्वरुपातील सर्वेक्षण प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले.

**प्रकल्प प्रमुख उदिष्टये :-**

१. ऑटोरिक्षा व्यवसायाची सद्यस्थिती समजून घेणे

२. हा व्यवसाय करणाऱ्यांची कौटुंबिक परिस्थिती कशा प्रकारची आहे ते जाणणे

३. या व्यवसायत चालकांची संघटना आहे काय ? व ती संघटना व्यवसायातील विविध समस्या कशा रितीने हाताळते ते जाणून घेणे.

४. कोणत्या वयोगटातील लोक हा व्यवसाय करतात हे तपासणे.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

५. व्यवसायात खर्च किती असतो हे जाणणे.

६. या व्यावसायिकांना खर्च वजा जाता उत्पन्न किती मिळते व ते कितपत पुरेसे आहे याचा मागोवा घेणे.

७. व्यवसायातील स्पर्धेचे स्वरूप समजून घेणे.

८. या व्यवसायातील समस्या कोणत्या आहेत ते जनतेसमोर मांडणे.

वरील उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेऊन वाणिज्य व व्यवस्थापन मंडळाने प्रकल्पाची आखणी केली.

सर्वात प्रथम सर्वेक्षण प्रकल्प मार्गदशक डॉ. अनिल स. पुरोहित यांनी वरील उद्दिष्टांना अनुसरुन काही प्रश्न काळजीपूर्वक निवडलेत त्यावरून एकोणतीस सूचक प्रश्नांचा समावेश असलेली प्रश्नावली तयार केली या व्यवसायातील ऑटो चालकाकडून सांखिकीय माहितीचे संकलन करण्यासाठी या प्रश्नावलीचाच उपयोग करण्यात आला आहे. ( तयार केलेल्या प्रश्नावलीचा नमुना शेवटी जोडलेला आहे.) प्रश्नावलीत साधारण असे प्रश्न समाविष्ट केलेत की ज्या द्वारा या व्यावसायिकांच्या समस्या तसेच त्यांची सद्यस्थिती याविषयी माहिती गोळा करता येईल.

चिखली परिसरातील ऑटोरिक्षा चालकांना ही वाणिज्य व व्यवस्थापन मंडळाने तयार केलेली प्रश्नावली पुरविली त्यांची विद्यार्थी यादी सुरवातीला दिलेली आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हे कार्य स्वयंस्फुर्तीने व हिरीरीने पूर्ण केले. त्यांच्या कार्यास दाद देणे अगत्याचे आहे. विद्यार्थ्यांनी ऑटो चालकांच्या भेटी घेतल्यात. त्यांना प्रकल्पाची माहिती पुरविली तसेच प्रश्नावलीत चालंकानी दिलेल्या उत्तरांची नोंद केली.

हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी **शि.प्र. मं. चे अध्यक्ष मा.रामकृष्णदादा शेटे , सचिव मा. प्रेमराजजी भाला , व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे , तसेच मार्गदर्शक प्रा. अनिल पुरोहित** यांनी सतत प्रोत्साहन दिले. तसेच वेळोवेळी मार्गदर्शन व मदतही केली त्यांच्या मार्गदर्शनातच हा प्रकल्प पूर्णत्वास गेला. त्यांचे ऋण निर्देश करणे वाणिज्य व व्यवस्थापन मंडळास आवश्यक वाटते.

**ऑटो चालकांची निवड :**

चिखली परिसरातील विभिन्न ऑटोरिक्षा चालकांना प्रश्नावली पुरविण्यात आली.. योग्य प्रतिनिधीत्व असावे यासाठी सर्व स्तरातील चालकांची निवड होईल अशी काळजी घेतली, निवड मात्र देव-निदर्शन Random पध्दतीनेच केली. त्यांनी प्रश्नावलीतील प्रश्नांना दिलेल्या उत्तरांच्या अनुषंगानेच हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

त्यांनी दिलेली माहिती ही बिनचूक व सत्य आहे. हे आम्ही गृहित धरले आहे. कांही चालकांनी दिलेली उत्तरे अर्धवट व अर्धसत्य होती. छाननी करतांना अशा प्रश्नावली बाद करण्यात आल्यात. तरीपण प्रश्नावतीलतील उत्तरे तथ्यांवर आधारित असतील असे म्हणता येणार नाही. सरतेशेवटी १०० ऑटो चालकांनी देलेली उत्तरे योग्य समजून व प्रमाण मानून हा अहवाल तयार केला.

चिखली मध्ये ऑटोरिक्षा चालकांची श्री रेणुका माता ऑटो रिक्षा चालक म. असोसिएशन चिखली ' ही संघटना सन १९८० ला स्थापन करण्यात आली आहे. या संघटनेच्या कार्याध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची मुलाखत सर्वेक्षण करणाऱ्या विद्यार्थ्यांव्दारे घेण्यात आली. यावेळी संघटनेचे पदाधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले.त्यांचे कडुनही आम्ही त्यांच्या संघटनेची तसेच त्यांच्या व्यवसायातील अडचणींची माहिती गोळा केली.

**ऑटोरिक्षा चालकांची सामान्य माहिती :-**

सर्वेक्षणासाठी ज्या १०० ऑटोरिक्षा चालकांची निवड केली त्यातील बहुसंख्य चालक चिखलीतील रहिवासी आहेत. याशिवाय परिसरात १० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या खेडयांमधूनही कांही चालक वास्तव्य करतात. व व्यवसायासाठी ते चिखली मध्ये दररोज जाणे-येणे करतात. १००पैकी ५१% चालकांचे वास्तव्य हे चिखलीमध्ये असून ४९ % चालक हे परिसरातील ग्रामिण भागातून येतात.

वास्तविक पाहता चिखली तालुक्यात १५० खेडयांचा समावेश आहे. चिखलीला बुलडाणा जिल्ह्याची राजकीय राजधानी म्हटले तरी वावगे होणार नाही. कोरोना महामारीच्या वेळेस राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस बंद असल्यामुळे अगदी टोकाचे म्हणजे उंद्री , देऊळगांव मही , भादोला , दे. साकर्शा , लव्हाळा , साखरखेर्डा इत्यादी भागातून शहरात ऑटोरिक्षाने लोकांचे येणे जाणे सुरु होते. आजही काही प्रमाणात ऑटोरिक्षाने प्रवासी वाहतुक सुरु आहे.

तरीपण निवडलेले ऑटो चालक ज्या विविध गावातील आहेत त्यांची माहिती पुढील तक्त्यात दिलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# -: निवडलेल्या ऑटोरिक्षा चालकांची गावानुसार विभागणी :-

| अ.क्र | गावाचे नांव | निवडलेल्या चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | चिखली | ५१ | ५१ % |
| ०२ | कोलारा | ०५ | ०५ % |
| ०३ | खैरव | ०२ | ०२ % |
| ०४ | मुंगसरी | ०१ | ०१ % |
| ०५ | हातणी | ०३ | ०३ % |
| ०६ | मालगणी | ०३ | ०३ % |
| ०७ | सोमठाणा | ०२ | ०२ % |
| ०८ | दिवठाणा | ०२ | ०२ % |
| ०९ | पेठ | ०२ | ०२ % |
| १० | शिंदी हराळी | ०२ | ०२ % |
| ११ | बोरगांव वसु | ०२ | ०२ % |
| १२ | गोद्री | ०४ | ०४ % |
| १३ | बेराळा | ०२ | ०२ % |
| १४ | मं. खंडाळा | ०४ | ०४ % |
| १५ | भोगावती | ०१ | ०१ % |
| १६ | पिंप्री आंधळी | ०१ | ०१ % |
| १७ | साकेगांव | ०२ | ०२ % |
| १८ | शेलुद | ०३ | ०३ % |
| १९ | मलगी | ०२ | ०२ % |
| २० | शे. जहाँगीर | ०३ | ०३ % |
| २१ | शे. आटोळ | ०१ | ०१ % |
| २२ | अंत्रीकोळी | ०२ | ०२ % |
| | **एकूण** | **१००** | **१०० %** |

तक्ता क्र. 01

## -: निवडलेल्या ऑटोरिक्षा चालकांची वयानुसार विभागणी :-

| अ.क्र | चालकाचे वय | निवडलेल्या चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| **०१** | ५१ ते ६० वर्षापर्यंत | २० | २० % |
| **०२** | ४१ ते ५० वर्षापर्यंत | ३० | ३० % |
| **०३** | ३१ ते ४० वर्षापर्यंत | २५ | २५ % |
| **०४** | २६ ते ३० वर्षापर्यंत | १५ | १५ % |
| **०५** | २१ ते २५ वर्षापर्यंत | १० | १० % |

**तक्ता क्र. ०२**

निवडलेल्या १०० ऑटोचालकांच्या एकूण सरासरी वयाची बेरीज ४०१३ वर्षे आहे. म्हणजेच प्रति चालकाचे सरासरी वय ४०.१३ वर्ष आहे. याचाच अर्थ बहुसंख्य ऑटो चालक तरूण आहेत. तरी पण २१ वर्षापासून ६० वर्षापर्यंत वय असलेले ऑटोचालक यात समाविष्ट आहेत. ६० वर्षा पेक्षा जास्त वय असणारा कोणीही नाही. तसेच २१ वर्षापेक्षा कमी वय असणाराही कोणी आढळला नाही ३१ वर्ष वा त्यापेक्षा जास्त वय असणारे २५ चालक आहेत. तर १० चालकांचे वय २५ वर्ष वा त्यापेक्षा कमी आहे.

**शैक्षणिक परिस्थिती :-**

या व्यवसायात पूर्ण निरक्षर असणारा एकही आढळत नाही. व्यवसायात चालकामध्ये १०० % साक्षरता आहे. बहुसंख्य चालकांचे शिक्षण ८ वी ते १२ वी पर्यंत झालेले आहे. आजच्या गतिमान जगात पूर्ण निरक्षरता शाप आहे. किमान काही शिक्षण आज तरी अत्यावश्यक आहे. याच निकषावर चालकांचा शैक्षणिक स्तर तपासण्याचा प्रयत्न केला बहुतेकांनी प्राथमिक शिक्षणाचा पायरी ओलांडली आहे. ४८ % चालकांनी इयत्ता १० पेक्षा अधिक शिक्षण घेतलेले आहे. ऑटो चालकांची शैक्षणिक परिस्थिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

Scanned with OKEN Scanner

## ऑटोरिक्षा चालकांची शैक्षणिक परिस्थिती

| अ.क्र | शिक्षण नांव | निवडलेल्या चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | १ ली ते ४ थी पर्यंत | ०९ | ०९ % |
| ०२ | ५ वी ते १० वी पर्यंत | ४३ | ४३ % |
| ०३ | ११ वी ते १२ वी पर्यंत | ३८ | ३८ % |
| ०४ | पदवी पर्यंत | १० | १० % |
| | **एकूण** | **१००** | **१०० %** |

**तक्ता क्र. ०३**

या व्यवसायात १०० % चालक हे पुरुष आहेत. या व्यवसायत चिखली परिसरामध्ये एकही स्त्री ऑटोचालक नाही.

**धर्म :-**

या व्यवसायात सर्वच धर्माचे लोक आहेत. परंतु त्यांच्यात परस्पर सामंजस्य आढळून येते. धार्मिक तेढ अजिबात नाही. धर्मानुसार चालकांची विभागणी खाली दाखवलेली आहे.

## धर्मानुसार ऑटोरिक्षा चालकांची विभागणी

| अ.क्र | गावाचे नांव | निवडलेल्या चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | हिंदु | ५० | ५० % |
| ०२ | मुस्लीम | ३० | ३० % |
| ०३ | बौध्द | १५ | १५ % |
| ०४ | खिश्चन | ०२ | ०२ % |
| ०५ | इतर | ०३ | ०३ % |
| | **एकूण** | **१००** | **१०० %** |

**तक्ता क्र. ०४**

Scanned with OKEN Scanner

## कौटुंबिक परिस्थिती:

ऑटो चालकांची कौटूंबिक परिस्थिती तपासण्यासाठी सर्वेक्षणामध्ये समाविष्ठ व्यक्तींना काही प्रश्न विचारण्यात आले होते.

१०० चालकांपैकी ७२ % चालकांचे स्वतःचे घर आहे. व २६ % चालकांना स्वमालकीचे घर नाही. ते भाड्याचे घरात वास्तव्य करतात. २ व्यक्तींनी या प्रश्नास उत्तर दिले नाही. तरीपण बहुसंख्य चालकांना वास्तव्यासाठी स्वतःचे घर आहे. ही त्यातल्या त्यात दिलासा देणारी बाब आहे.

**विवाह व सदस्य संख्या :-**

या चालकांच्या कुटूंबात रहाणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या आजच्या महागाईच्या परिस्थीतीमध्ये लक्षणिय तसेच चिंताजनक वाटते. १०० चालकांच्या कुटूंबातील सर्व सदस्यांची एकत्रित संख्या ५३५ एवढी आहे. याचाच अर्थ प्रत्तेकाचे घरी सरासरीने ५ पेक्षाही अधिक लोक वास्तव्य करीत आहेत. या चालकांना मिळणारे अल्प उत्पन्न व कूटूंबातील सभासदांची मोठी संख्या यांची तुलना केल्यास गंभीर निष्कर्ष निघतो. या लोकांच्या कुटूंबात अनुत्पादक उपभोक्त्यांचे प्रमाण जास्त आहे. म्हणजेच कुटूंबात कमावते नसणारे पण कुटूंबाच्या उत्पन्नवरच जीवन जगणारे जास्त आहेत. या कुटूंबावर अनुत्पादक उपभोक्त्यांच्या मोठा भार आहे. निम्न जीवन स्तरांचा हा एक निकष आहे.

१०० चालकांच्या कुटूंबात एकूण ५३५ सदस्य आहेत, व त्यांच्या कुटूंबात ऑटो चालक धरून एकूण १७५ सभासद हे प्रत्यक्ष कमावते आहेत. म्हणजेच १७५ सभासद एकूण ५३५ व्यक्तींचे पोषण करतात. याचा अर्थ असाही होतो की जवळपास प्रत्येकी ३ व्यक्तीमागे सरासरीने फक्त १ व्यक्ति कमावती आहे. ऑटो चालकांच्या कुटूंबात अशा रितीने जवळपास ३३ % सदस्य हे उत्पादक उपभोक्ते आहेत. तर ६७ % सदस्य हे अनुत्पादक उपभोक्ते आहेत. परिणामी बहुतांश ऑटो चालकांचे जीवन गरीबीच्या सीमारेषेभोवती रेंगाळत आहे.

बहुतेकांची घरे ही २ ते ३ खोल्यांचीच आहेत. बहुतांश कुटूंबात सदस्य संख्या जास्त आहे. परंतु निवाऱ्याच्या खोल्यांची संख्या मात्र कमी आहे. कुटूंबातील सदस्य व खोल्यांची संख्या यांचे व्यस्त प्रमाण आढळते. ही बाब देखील चालकांच्या निम्न जीवनस्तराचे गमक आहे.,

**विवाह :-**

१०० पैकी ७९ % चालक हे विवाहित आहेत. तर २१ % चालक हे अजून अविवाहित आहेत. ७९ विवाहितांना मिळून एकूण १६१ अपत्य आहेत. म्हणजेच प्रति विवाहितास जवळपास २ अपत्य आहेत. ४ पेक्षा जास्त मुले कोणालाही नाहीत. ही त्यातल्यात्यात समाधानाची बाब आहे. ९ चालकांना ३ वा त्यापेक्षा जास्त मुले आहेत. तर ७० विवाहितांना ३ पेक्षा कमी मुले आहेत. १६१ अपत्यांपैकी ८७ मुले आहेत तर ७४ मुली आहेत. याचा अर्थ मुला व मुलींचे प्रमाण ५४ : ४६ असे आहे.

पुढे दिलेल्या तक्यामध्ये ऑटो चालकांची विवाह विषयक परिस्थिती दर्शविली आहे.

**ऑटोरिक्षा चालकांची वैवाहिक स्थिती**

| अ.क्र | घटक | चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | विवाहित चालक | ७९ | ७९ % |
| ०२ | अविवाहित चालक | २१ | २१ % |
| | **एकूण** | १०० | १०० % |

**तक्ता क्र. ५**

**ऑटोरिक्षा संबंधी :-**

ऑटो रिक्षा चालकांच्या ऑटो संबंधी माहिती व्हावी. या दृष्टीने त्यांना कांही प्रश्न विचारले होते. त्यांच्या प्रतिसादानुसार असे आढळले की, बहुसंख्य चालकांच्या स्वमालकीची ऑटो रिक्षा आहे.७२ % ऑटो चालक स्वत:च्या मालकीची ऑटो रिक्षा वापरतात. तर केवळ २८ % ऑटो चालकांना ऑटो रिक्षा नसल्यामुळे भाडयाने घ्यावी लागते. ऑटो चालवितांना ऑटो रिक्षाचे दरमहा भाडे ३००० /- रुपये द्यावे लागते.

Scanned with OKEN Scanner

## ऑटो रिक्षाची मालकी दाखविणारा तक्ता

| अ.क्र | घटक | चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | स्वत:ची ऑटो रिक्षा असणारे | ७२ | ७२ % |
| ०२ | भाडयाची रिक्षा चालविणारे | २८ | २८ % |
| | **एकूण** | **१००** | **१०० %** |

**तक्ता क्र. ०.६**

ज्यांच्या मालकीची ऑटो रिक्षा आहे त्यातील ७० % पेक्षा जास्त चालकांची ऑटो रिक्षा बरीच जुनी आहे. १०० पैकी ०२ चालकांनी ऑटोची किंमत नोंदविली नाही. ९८ चालकांनी खरेदी करतांना दिलेल्या किमतीची माहिती खालील तक्त्यात दाखविली आहे.

## ऑटोरिक्षा खरेदीसाठी दिलेली किंमत दाखविणारा तक्ता

| अ.क्र | खरेदी किंमत | चालकांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | ६०,००० रुपया पर्यंत | ६० |
| ०२ | ६१,००० रु. ते १,२०,००० पर्यंत | १३ |
| ०३ | १,२०,००० रु. ते ०१,८०,००० पर्यंत | १८ |
| ०४ | १,८१,००० रुपयांपेक्षा जास्त किंमत | ०७ |
| | **एकूण** | **९८** |

**तक्ता क्र. ७**

**टीप :-** दोन चालकांनी माहिती दिली नाही.

ऑटोरिक्षा खरेदी करण्यासाठी ४५ % चालकांनी कर्जाची उचल केली होती. मुख्यतः बँकेव्दारा कर्ज घेण्यात आले. अजून २३ % चालकांकडे ऑटोसाठी घेतलेल्या कर्जाची बाकी आहे. कर्जाची थकबाकी मात्र नाही.

ऑटोरिक्षाचा व्यवसाय या गावात फार जुना आहे. बहुतेकांनी हा व्यवसाय मागील विस वर्षाच्या आतच सुरू केला आहे तुरळक २० - २५ चालक गत ४० वर्षापासून हा व्यवसाय करीत आहेत.

ऑटोचालकांच्या ऑटोमध्ये सुविधांचे प्रमाणही यथातथाच आहे. ०२ % चालकांच्या ऑटोमध्ये टेपची सुविधा आहे. ०१ % ऑटो चालकांच्या ऑटोमध्ये शो लाईट आढळतात

Scanned with OKEN Scanner

तर ६५ % ऑटो चालकांच्या ऑटोला थंडी व पावसापासून प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पडद्यांची व्यवस्था केलेली आहे. बऱ्याचशा ऑटो जुन्याही असल्यामुळे प्रवाशांसाठी आरामदायी रिक्षांचे प्रमाण कमी आहे.

३५ % चालकांनी ऑटोरिक्षाचा विमा काढला आहे. कोणताच चालक हा रिक्षाचे भाडे मीटर प्रमाणे घेत नाही . प्रवाशांचे जवळ जर मर्यादित सामान असेल तर बहुतेक चालक त्याचे स्वतंत्र भाडे आकारीत नाहीत.

ऑटोचालकांची ऑटो रिक्षा ही सामान्यतः जुनी असल्यामुळे रिक्षाचे Average अतिशय कमी आहे. प्रत्येकाची जुनी व नविन ऑटोरिक्षा सरासरीने प्रतिलीटर पेट्रोलला सरासरी १८ ते २४ किलो मीटर Average देते. मायलेज कमी असल्यामुळे त्याचा चालकांच्या उत्पन्नावर विपरित परिणाम होतो.

**व्यवसायाचे स्वरूप :-**

ऑटो चालकांचा सामान्यतः दिवसभराचा कार्यक्रम हा अतिशय व्यस्त स्वरूपाचा दिसतो. बहुतेक व्यावसायिकसाकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत आपल्या व्यवसायास आरंभ करतात. व रात्री ८ ते १० वाजेपर्यंत त्यांच्या व्यवसाय चालू असतो. तर काहीजण रात्री ८ ते सकाळी ६ वाजेपर्यंत व्यवसाय करतात. प्रत्येकजण सरासरीने दिवस भरात जवळपास १२ तास व्यवसायात गुंतलेला असतो.

चालकांना कोणत्या काळात व्यवसाय अधिक चालतो असा प्रश्न विचारला होता. बहुतेकांच्या मतानुसार तो उन्हाळ्याच्या दिवसात तथा दिपावलीच्या वेळी सर्वात जास्त चालतो. लग्न सराई व शाळांना सुटी असल्यामुळे या दिवसांत प्रवास करणाऱ्यांची संख्या जास्त असते. त्यामुळे उन्हाळ्यात उत्पन्न सर्वात जास्त मिळते.९० % चालकांनी ही बाब मान्य केली आहे.

४९ ऑटो चालक हे नियमितपणे प्रवाशांना आजुबाजुच्या खेड्यांतून ने-आण करतात. फक्त चिखलीतच ते प्रवाशांची वाहतूक करीत नाहीत. तर ५१ % ऑटो चालक आपला व्यवसाय फक्त चिखलीच करतात. आजुबाजुच्या खेड्यात ते प्रवाशांना नेत नाहीत.

**परगावी प्रवाशांची वाहतूक स्थिती**

| अ.क्र | घटक | चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | परगावी नियमितपणे नेणारे चालक | ४९ | ४९ % |
| 02 | शहरात नियमितपणे न नेणारे चालक | ५१ | ५१ % |
| | **एकूण** | **१००** | **१०० %** |

**तक्ता क्र. ८**

Scanned with OKEN Scanner

कांही ऑटो चालकांचे दरमहा बांधील ग्राहक आहेत. बालक मंदीर, प्राथमिक शाळा शिकणारे बरेचसे विद्यार्थी दररोज ऑटोतून शाळेत जाणे-येणे करतात. तसेच काही अंपग विद्यार्थी, माध्यमिक व इतर शाळातून नोकरी करणाऱ्या शिक्षिका तसेच कांही भाजीवाले व इतर छोटे मोठे व्यापारी हे ऑटो चालकांचे दरमहा बांधील ग्राहक आहेत. २० % चालकांचे असे दरमहा बांधील ग्राहक आहेत. परंतु ८० % चालकांकडे असे बांधील ग्राहक नाहीत.

**ऑटोरिक्षा मध्ये प्रवास करणारे दरमहा बांधील ग्राहक**

| **अ.क्र** | **घटक** | **चालकांची संख्या** | **प्रतिशत प्रमाण** |
|---|---|---|---|
| **01** | बांधील ग्राहक असणारे | २० | २० % |
| **02** | बांधील ग्राहक नसणारे | ८० | ८० % |
| | **एकूण** | १०० | १०० % |

**तक्ता क्र. ९**

प्रवासी नेत असतांना प्रवाशांशी भाडे, सामान व अन्य संदर्भात बाचाबाची , हुज्जत होते काय ? या प्रश्नाचे संदर्भात ९०% ऑटो चालकांच्या मतानुसार प्रवाशांशी कोणतीही हुज्जत होत नाही असे म्हंटले. तर १० % चालकांना मात्र अशी हुज्जत होतेच असे म्हंटले आहे

**स्पर्धा व उत्पन्न :-**

या व्यवसायात मागील साधारण १५ वर्षात अनेक व्यक्तींनी प्रवेश केला. अन्यत्र वाव नसल्यामुळे, शेतीची कामे जमत नसल्यामुळे तसेच या व्यवसायात अंगमेहनतीचे जास्त काम नसल्यामुळे परिसरातील अनेक सुशिक्षित बेरोजगार युवकांनी प्रवेश केला. त्यामुळे गावातील चालकांची संख्या वाढली. याशिवाय गावात टेम्पो व ट्रॅक्समधूनही वाहतूक चालू आहे. परिणामी व्यवसायात स्पर्धा प्रचंड प्रमाणात वाढली. त्याचा या व्यावसायिकांच्या उत्पन्नावर अतिशय विपरित परीणाम झाला. गावाचा आवाका लक्षात घेतल्यास ही स्पर्धा मारक ठरत आहे. भविष्यातही स्पर्धा अधिकच तिव्र बनण्याची शक्यता आहे. त्यामुळे या व्यवसायाचे भविष्यही फारसे आशादायक वाटत नाही.

या व्यवसायात आकारले जाणारे प्रवासी भाडेही अतिशय कमी आहे. मागील दोन वर्ष सोडल्यास गेल्या अनेक वर्षापासून गावातील ऑटोरिक्षाचे भाडे जवळपास स्थीर आहे. त्यात विशेष वाढ झालेली नाही. गत ५ वर्षात पेट्रोलचे व ऑईलचे भाव अनेकदा वाढलेत परिणामी खर्चाचे प्रमाणही वाढले. वस्तुतः अशा कारणांमुळे भाडेवाढ

Scanned with OKEN Scanner

तर्कसंगत व आवश्यक ही वाटते. परंतु चालकांची वाढती संख्या, त्यांच्यातील गळेकापू स्पर्धा, प्रभावी व सशक्त संघटनेचा अभाव इत्यादी कारणामुळे प्रवासी भाडे फार काही वाढले नाही. गावाच्या कोणत्याही भागातून कुठेही गावात जाण्यासाठी ३० रुपये भाडे हा दर कायम आहे. वास्तविक अन्य व्यवसायात याच काळात किंमतीत भरीव वाढ झ ाली. शिंपी, न्हावी आदि व्यावसायिकांनी आपल्या सेवांचे दर वाढविलेत. परंतु हा व्यवसाय मात्र त्यास अपवाद ठरला. स्थीर भाड्याचा परिणाम त्यांचे उत्पन्नावर झ ालेला आहे.

गांवातील खराब रस्ते, जुन्या ऑटो असल्यामुळे सतत करावा लागणारा दुरूस्ती खर्च, मोठी स्पर्धा, वाहतूकीचे कायम दर, सरकारी करांचा व इतर व्यवसाय खर्चाचा वाढता दबाव इत्यादि कारणामुळे व्यावसायिकांना प्राप्त होणारे उत्पन्न अत्यल्प आहे. त्यामुळे या व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे. त्यात कर्जाचे हप्ते व व्याजाचा वाढता दबाव यामुळे अनेक जण जेरीस आलेले आहेत. दरमहा खर्च वजा जाता उत्पन्न किती मिळते. असा प्रश्न विचारला होता. त्यास दिलेले उत्तर प्रमाण मानले तर त्यांच्या उत्पन्नातून या व्यक्तिंचे दारिद्रयच प्रतिबिंबीत होते. प्रत्येकाचे मासीक सरासरी उत्पन्न जेमतेम ६०००/- रूपये इतके अत्यल्प आहे. केवळ१२ % चालकांचे उत्पन्न हे ८००० /- रू. वा त्यापेक्षा जास्त आहे. या आकडेवारीवरून हा वर्ग दारिद्रयाच्या सीमारेषेभोवती घोटाळत आहे. असा दावा करता येतो.

फावल्या वेळात ६०%चालक हे पेपर, मासिके, पुस्तके यांचे विरंगुळा म्हणून वाचन करतात. ४० % चालकांना त्याची गोडी नाही.

६९% चालक आपल्या अल्प उत्पन्नातूनही भावी अडचणींच्या तरतूदीसाठी नियमित बचत करतात.

**:- नियमित बचतीची स्थिती :-**

| अ.क्र | घटक | चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | नियमित बचत करणारे | ६९ | ६९ % |
| ०२ | नियमित बचत न करणारे | ३१ | ३१ % |
| | **एकूण** | १०० | १०० % |

**तक्ता क्र. १०**

**परमिट :-**



चालकांजवळ रिक्षा चालविण्याचे परमिट आवश्यक असते. पण विविध कारणामुळे ३५ % ऑटो चालकांकडे ऑटोरिक्षाचे परमिट मात्र नाही. ३० % चालकांना मोठ्या शहरात जाऊन व्यवसाय करावासा वाटतो. व ७० % चालकांना चिखली परिसरातच कायम व्यवसाय करण्यात स्वारस्य आहे.

**:- परवानाधारक ऑटोरिक्षा चालक :-**

| अ.क्र | घटक | चालकांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | परवानाधारक चालक | ६५ | ६५ % |
| ०२ | बिना परवानाधारक चालक | ३५ | ३५ % |
| | एकूण | १०० | १०० % |

**तक्ता क्र. ११**

**व्यवसायाची निवड :-**

हा व्यवसाय का निवडला या प्रश्नाचे उत्तरात चालकांनी दिलेली उत्तरे सुचवितात की, हा व्यवसाय निवडण्याचे सर्वाधिक महत्वाचे कारण बेरोजगारी हेच आहे. ७६% चालक बेरोजगारीमुळे या व्यवसायाकडे वळले. सुशिक्षित बेरोजगारांचे शिक्षणात पूर्वायुष्य गेल्यामुळे शेतीची कामे जमत नाहीत. तसेच त्यात गोडीही नाही व नोकरीची संधी नसल्याने या व्यवसायाची निवड केली. १५% चालकांनी हाच व्यवसाय आवडतो म्हणून हा व्यवसाय पत्करला. एकाने स्वतंत्र व्यवसायाची आवड असल्यामुळे व्यवसाय पत्करलेला आहे ३ % चालकांनी यात नगदी पैसा मिळतो म्हणून व्यवसायाची निवड केलेली आहे. ६३ % चालकांना हा व्यवसाय सोडून अन्य व्यवसायाची इच्छा आहे.

**ऑटोरिक्षा असोशिएशन :-**

चिखलीतील ऑटारिक्षा चालकांनी १९८० साली ऑटो चालकांची श्री रेणुकामाता ऑटोरिक्षाचालक म. असोशिएशनची स्थापना केलेली आहे. संघटनेची कार्यकारिणी अस्तीत्वात असून तिचे मुख्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत.

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र | पदाधिकाऱ्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ०१ | मा. श्री. राहुलभाऊ बोंद्रे | अध्यक्ष |
| ०२ | मा. श्री. संजयजी पैठणकर | कार्याध्यक्ष |
| ०३ | मा. श्री. गजाननभाऊ दंदाले | उपाध्यक्ष |
| ०४ | मा. श्री. गजाननभाऊ धेवंदे | उपाध्यक्ष |
| ०५ | मा. श्री. शेनफडभाऊ भालके | कोषाध्यक्ष |
| ०६ | मा. श्री. देवीदासभाऊ मगर | सल्लागार |

या संघटनेत परिसरातील जवळपास सर्व ऑटोचालक हे संघटनेचे सदस्य आहेत. म्हणजेच सर्व ऑटो चालकांना संघटनेचे महत्व माहित आहे. याचा अर्थच असा की, असा कोणीच नाही की ज्याला संघटनेचे महत्व, संघटित शक्तीची किमया व एकीची निकड अवगत नाही. या व्यवसायासमोर अनेक प्रश्न आहेत. अपूरे भाडे, अपूरे थांबे, परमिट, लायसन्स इत्यादि प्रश्नांची उकल प्रभावी संघटनेच्या माध्यमातूनच होऊ शकते. परंतु हे व्यवसायिक संघटीत असूनसुध्दा असंघटित सारखे वागतात. त्यामुळे त्यांचे प्रलंबित प्रश्न तसेच कायम आहेत. त्यासाठी सभासदांना एकत्रीत होणे अतिशय गरजेचे आहे.

या संघटनेचे शहरात अनेक ठिकाणी थांबे आहेत. जिथे चालक प्रवाश्यांची वाट पहाण्यासाठी थांबतात. परंतु तरीही थांब्यांची ही संख्या कमी वाटते. थांब्याची जागा वाढविण्याचे संघटना प्रयत्न करीत आहे. थांबे वाढऊन मिळावेत यासाठी नगर परिषद, जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, आमदार यांचेकडे पत्र व्यवहार करीत आहे.

संघटनेला ऑटो चालकांची मोठी संख्या व त्यांच्यातील स्पर्धा यामुळे भाडे वाढ करण्यात अडचण येत आहे. संघटनेने आजपर्यंत पुढील महत्वाचे कार्य केलेले आहे.

१. ऑटोरिक्षा चालकांसाठी दररोज एक वृत्तपत्र वाचनासाठी उपलब्ध असते.
२. एखाद्या ऑटोरिक्षा चालकांच्या ऑटोचे मोठे नुकसान झाल्यास त्यास सर्वमिळून आर्थिक सहाय्य पुरविले जाते.
३. एखाद्या प्रवाशाचे पैसे हरवल्यास अगर चोरीला गेल्यास त्वरित मदत दिली जाते.

Scanned with OKEN Scanner

४. नशेत असणाऱ्या प्रवाशास त्याचे घरी व्यवस्थित पोहोचविण्याची व्यवस्था संघटनेचे सभासद करतात.

५. अतिशय गरीबांचे घरी लग्न असल्यास तसेच दवाखान्याचा असल्यास त्यांना जमेल तसे सहकार्य करतात.

एकंदरीत विचार करता या व्यवसायात संघटना आहे. परंतु ती व्यवसायातील मूलभूत प्रश्न सोडविण्याचे संदर्भात प्रभावशाली आज तरी वाटत नाही. व त्याचे कारण मुख्यतः सभासदांचा अल्प सहभाग , ऑटो चालकांची अवाजवी जास्त संख्या, बरेचशे ऑटो चालक संघटनेचे सभासद असून सुध्दा संघटनेच्या बाहेर असल्यासारखे दिसतात त्यामुळे सशक्त एकीचा अभाव आहे असे वाटते.

**ऑटोरिक्षा व्यवसाया समोरील समस्या :-**

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, हा व्यवसाय स्वयंरोजगाराचा एक मार्ग आहे. पण व्यवसाय समस्याग्रस्त आहे. विविध अडचणीमुळे चालकांचे कंबरडे मोडत आले आहे. कर्ज काढून कुटूंबाचा उदर निर्वाह चालविण्यासाठी अनेक बेरोजगारांनी ऑटोरिक्षा घेतल्या आहेत. पण विविध समस्या, सतत बदलणारे नियम व बंधने व सार्वत्रिक उदासिनतेमुळे चालक जेरीस आलेले आहेत. या व्यवसायात पुढील प्रमुख समस्या आहेत.

**समस्या :-**

१. पेट्रोलचे व मशीन ऑईलचे दर अतिशय जास्त आहेत. व त्यामुळे व्यवसायाचा खर्च वाढलेला आहे. परिणामी व्यवसाय किफायतशीर ठरत नाही.

२. कोरोना महामारीमुळे प्रवासी वाहतुकीचे नियम कठोर झाले त्यामुळे कर्ज सतत वाढत आहे.

३. प्रवाशांची वाट पाहण्यासाठी गावांत कांही थांबे आवश्यक असतात. परंतु गावांत त्यांची संख्या आवश्यकतेपेक्षा कमी आहे. तसेच थांब्यांची जागाही अपूरी आहे.

४. गावातील रस्ते अत्यंत वाईट अवस्थेत आहेत. खड्डे व खाच खळगे यामुळे चालकांना व प्रवाशांना वाहतूक करणे आरामदायी वाटत नाही.

Scanned with OKEN Scanner

व ऑटोरिक्षाही त्यामुळे सतत नादुरूस्त होते.

५. जुन्या झालेल्या ऑटोमुळे डागडूजी व दुरूस्तीचा खर्च खूप वाढलेला आहे. व्यवसायांत प्रचंड स्पर्धा आहे. व त्याची सर्वांनाच झळ पोहोचत आहे.

६. व्यवसायात प्रचंड स्पर्धा आहे व त्याची झळ पोहचत आहे.

७. व्यवसायात सशक्त संघटना नाही. जी संघटना आहे तिचे सदस्य सर्व चालक असले तरी अपूरा निधी इत्यादिमूळे संघटनेला भाडे, थांबे इ. प्रश्न सोडविण्यात अपयश येत आहे. चालकांची मोठी संख्या पण सभासदांचा कमी सहभाग संघटनेसाठी एक डोके दुखी ठरत आहे.

८. प्रवासी भाडे अतिशय कमी आहे. व त्यात वाढ करण्यात अडचणी येत आहेत.

९. परमीट व लायसन्स साठी असणारे नियम क्लिष्ट आहेत. त्यामुळे ते मिळाविण्यात अतिशय त्रास होतो व त्याचा खर्च ही अवाजवी असतो. परमिट संबंधीचे नियम चालकांना अडचणीचे ठरत आहेत. जुन्या ऑटोरिक्षांची खरेदी केल्यास परमिट मिळत नाही. त्यामुळे ऑटो व्यवसाय करणे जोखमीचे व कटकटीचे ठरत आहे.

१०. व्यवसायात उत्पन्न अतिशय कमी आहे. त्यामुळे कुटूंबाचा उदर निर्वाह चालविणे , मार्च २०२० पासून एक वर्षभर कोरोना नियमांमुळे कर्जाचे हप्ते व व्याज देणे त्रासदायक ठरत आहे त्यामुळे चालक मोरकुटीस आलेले आहेत.

११. अपघात, खराब व अरूंद रस्ते, वाढलेली वाहतूक, रस्त्यावरील दारू पिऊन चालणारे नशेबाज,मोकाट जनावरे यामुळे सर्वच रस्ते अपघात प्रवण बनलेले आहेत. परिणामी व्यवसाय जोखमीचा बनला आहे.

१२. कर्ज मिळविण्यात बऱ्याच क्लिष्ट प्रक्रिया असतात. त्यामुळे त्यातही विलंब व त्रास होतो.

१३. कागदपत्रांची पूर्तता नसल्यामुळे तसेच विनाकारणही पोलीसांचा त्रास होत असतो.

Scanned with OKEN Scanner

१४. वास्तविक ऑटोरिक्षा व्यवसाय हा एक स्वयंरोजगाराचा उत्तम मार्ग आहे. स्वयंरोजगारास व छोट्या व्यवसायांना उत्तेजन देण्याचे शासकीय धोरणही आहे. परंतु या व्यवसायाकडे, त्यांना सवलती देण्याकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. शासनाची उदासिनता त्यांना मारक ठरत आहे. सरकार कडून या लोकांना कसल्याही सुविधा मिळत नाहीत.

**उपाय :** -

या व्यवसायातील अडचणी सोडाविण्यासाठी बहुआयामी प्रयत्न झालेच पाहिजेत. नगर परिषद, या भागातील आमदार, शासकीय कार्यालये, सरकार व सामाजिक संस्था यांनी या व्यवसायाबद्दलची उदासिनता संपऊन या व्यवसायातील प्रश्न सोडविण्यात स्वारस्य दाखविले पाहिजे. या व्यवसायात पुढील सुधारणा होणे आवश्यक वाटते.

१. कोरोना महामारीमुळे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी शासनाने सानूग्रह अनुदान देऊन ऑटोचालकांना आर्थीक मदत केली पाहिजे.

२. व्यवसाय किफायतशिर व्हावा, कुटूंबाचा चरितार्थ चालावा, यासाठी प्रवासी भाड्याचे दर वाढविण्यात आले पाहिजेत. यासाठी चालकांनीच संघटित प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी भक्कम एकजूट घडऊन आणली पाहिजे. या समस्येसाठी चालकांनीच सक्रियता दाखविणे जरूरीचे आहे.

३. ऑटो संघटनेच्या नवीन सभासदांची संख्या वाढविली पाहिजे. गावातील व परिसरातील सर्व ऑटो चालक हे संघटनेचे सभासद झाले पाहिजेत यासाठी व्यापक प्रयत्न केले जावेत. १०० % सदस्यत्व है उद्दिष्ट ठरवून चळवळ हाती घ्यावी. तसेच संघटनेने स्वतःचा कायम निधी उभारावा.

४. गावातील थांबे (पार्किंग) वाढविण्यात यावेत. यासाठी नगर परिषद, लोकप्रतिनिधी व शासनाने मदत करावी. त्यांनी या प्रश्नात सहानुभूतीपूर्वक लक्ष घालावे.

५. पेट्रोलचे दर अतिशय जास्त आहेत. सरकार अनेक व्यवसायात सवलती

Scanned with OKEN Scanner

देते. अनेकांना सबसिडी पुरविते. या व्यवसायाबद्दल मात्र उदासिनता दाखविते. गोरगरीब लोकांना बाजार भावापेक्षा कमी दरात रॉकेल पुरविते. इतर अनेकांना सवलती देणाऱ्या शासनाने या व्यवसाचाही सहानुभूतीपूर्वक विचार करावा. ऑटोरिक्षा व्यवसाय हा एक स्वयंरोजगार आहे. त्यास उत्तेजन देणे जरूरीचे आहे. तेव्हा सरकारने रॉकेलच्या दराप्रमाणेच या व्यवसायिकांना कमी दराने पेट्रोलचा नियमित पुरवठा (Control Rate) करावा. व त्याची काटेकोर अमंलबजावणी करावी.

६. रस्त्यावरील मोकाट जनावरांचा वाहतूकीत व्यत्यय येतो. तसेच अपघातास नियंत्रण ठरते. तेव्हा नगर परिषदेने व पोलीस यंत्रणेने या प्रश्नांत लक्ष घालावे.

७. लायसन्स व परमिट मिळविणे हे या व्यवसायिकांना त्रासदायक ठरत आहे. तेव्हा या संदर्भातील नियम सोपे व सुटसुटीत बनविण्यात यावेत. या शिवाय आङजुनी (Second hand) ऑटो खरेदी करणारांनाही ऑटो वहातुकीचे परमीट दिले जावे. परमीट नियमातील क्लिष्टता तसेच त्यातील त्रासदायक अटी शिथील करण्यात याव्यात. सरकारचे आज उदारीकरणाचे धोरण आहे. याही व्यवसायात शासनाने उदारीकरणाचे धोरण अवलंबिले पाहिजे. जाचक अटी हटविल्या जाव्यात. परमीटच्या अटी शिथील केल्या जाव्यात.

८. नगर परिषदेने व शासनाने गावांतील रस्ते दुरुस्तीचा धडक कार्यक्रम राबविला पाहिजे तसेच योग्य ठिकाणी स्पीड ब्रेकर्सची व्यवस्था करावी. त्यामुळे अपघाताचे प्रमाण घटेल. तसेच आरामदायी वाहतूक राहील.

९. या व्यावसायिकांना कर्ज मिळविण्यातही असुविधा सहन कराव्या लागतात. तेव्हा या व्यवसायिकांनाही इतर व्यावसायिकांप्रमाणे सहजतेने सोयिस्कर स्वरूपाचे कर्ज मिळण्याची व्यवस्था केली जावी. कर्ज प्राप्तीतील विलंब, दप्तर दिरंगाई आदि दोष दूर करण्यात यावेत. कर्ज वितरणात सुलभता असावी. याशिवाय व्याजाचे दर न्यूनतम असावेत. व कर्जातही सबसिडी दिली जावी. छोट्या प्रमाणावरील व्यवसायांना दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती याही व्यवसायास उपलब्ध असाव्यात.

Scanned with OKEN Scanner

१०. रोटरी क्लब, सार्वजनिक ट्रस्ट, लायन्स क्लब , विविध राजकिय संघटना व अन्य सेवाभावी संस्थानी शासनाच्या सहकार्याने ग्रामिण भागात प्रतिवर्षी एकातरी R. T.O. कॅम्पचे आयोजन करावे. अशा कॅम्पमुळे चालकांचे पांसिग लायसन्स, त्याचे नुतनीकरण, परमिटचे काम सुलभतेने व कमी खर्चात पूर्ण करता येईल. वैद्यकिय व्यवसायात जसे मोफत वैद्यकिय शिबीर आयोजित केले जाते. तसाच उपयुक्त उपक्रम इथेही राबवावा.

११. मुंबई सारख्या शहरी पेट्रोलएवजी C.N.G. वर टॅक्सी चालविल्या जातात. त्यामुळे प्रदुषणाचे प्रमाण कमी होते. व खर्च ही कमी असतो. नागरीकांचे आरोग्य, प्रदुषणमुक्त वातावरण यासाठी C.N.G. वापराचा प्रयोग चिखली शहरात अवलंबण्यात यावा. त्यामुळे अनारोग्य, प्रदुषण, रॉकेलची भेसळ इत्यादि समस्या दूर होऊ शकतील.

**ऑटोरिक्षा चालकांच्या बोलक्या प्रतिक्रिया :-**

या व्यवसायातील अडचणी व व्यवसायात कोणत्या सुधारणा केल्या जाव्यात. यासंबंधी विचारलेल्या प्रश्नांना चालकानी विविध उपाय सांगितलेत. तसेच त्यांनी विविध प्रतिक्रिया व्यक्त केल्यात. त्यातील कांही चालकांच्या निवडक प्रतिक्रिया खाली दिल्या आहेत.

१. या व्यवसायात अडचणीच अडचणी आहेत.

२. दहा वर्षापूर्वी व्यवसाय चांगला होता. आज नाही.

३. घरचे भागत नाही. खर्च जास्त उत्पन्न कमी मिळते.

४. मासिक उत्पन्न कमी पडते.

५. पार्किंगसाठी जागा पाहिजे.

६. उत्पन्न कमी मेंटेनन्स जास्त.

७. कोणताही दंड वसूल करू नये. दंड नाही आकारला तरी सरकारला काही फरक पडणार नाही परंतु अवाजवी दंडामुळे

रिक्षावाले यांचेवर उपाशी राहण्याची पाळी येत आहे.

८. सरकारकडून आम्हाला कोणत्याही सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे त्यांनी आमच्या कडून कोणताही दंड वसूल करू नये. कारण उत्पन्न केवळ ६००० रु मिळते त्यात दंड लागला तर पुर्ण महिण्याचे बजेट बिघडते.

९. ऑटो चालकासाठी कांही पायाभूत सुविधा सरकारने दयाव्यात.

१०. मोकाट जनावरांचा त्रास होतो.

११. व्यवसायांत अनिश्चितता फार आहे.

१२. परिस्थितीत स्थिरता नाही म्हणून प्रगती होत नाही.

एकंदरीत चिखली परिसरातील ऑटोरिक्षा चालकांचा व्यवसाय फारसा किफायतशिर नाही. त्यात अनेक समस्या आहेत. व त्या सोडविण्याची नितांत आवश्यकता आहे.परंतु रोजगार उपलब्ध नसल्यामुळे एक सोपा व्यवसाय म्हणून त्याकडे बेरोजगार युवक आकर्षित होत आहेत.

...........**समाप्त** ...........

Scanned with OKEN Scanner

# शि.प्र.मं. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय , चिखली

## वाणिज्य व व्यवस्थापन विभाग

## सर्वेक्षण प्रकल्प प्रश्नावली

**विषय :- चिखली परिसरातील ऑटोरिक्षा चालकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थीतीचे अध्ययन.**

प्रति ,

मा. महोदय ,

शि.प्र.मं. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली अंतर्गत वाणिज्य व व्यवस्थापन विभागाव्दारा आयोजित शैक्षणीक सर्वेक्षण प्रकल्प अंतर्गत उपरोक्त विषयाच्या अभ्यासाच्या हेतुने व केवळ शैक्षणिक उद्दिष्ठ्ये पूर्ण करण्यासाठी सर्वेक्षणातून आपल्या आर्थिक व सामाजिक परिस्थीतीचे अध्ययन करण्यासाठी निम्मलिखीत प्रश्नावलीत दिलेल्या प्रश्नांची उत्तरे आपल्या कडून अपेक्षीत आहेत. आपणाकडून प्राप्त माहिती ही केवळ महाविद्यालयातील विभागापुरती मर्यादित व गोपनिय राहील.

कृपया प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे देऊन सहकार्य करावे ही विनंती.

| | |
|---|---|
| **मार्गदर्शक** , | **संशोधक** , |
| **प्रा. डॉ. अनिल स. पुरोहित** | **वाणिज्य अंतिम वर्षातील विद्यार्थी** |

सुचना :- प्रश्नावलीतील पर्यायासमोर (✔) चिन्ह व आवश्यक त्या ठिकाणी शब्दात व संख्येत उत्तरे द्यावीत.

Scanned with OKEN Scanner

1. चालकाचे पूर्ण नांव :- ______________________

2. अ ) गांव / पत्ता :- ______________________ वय ________

धर्म ______________ शिक्षण ______________

ब ) विवाहीत / अविवाहीत ________ मुलांची एकूण संख्या ________

मुले / मुली ______________

3. अ ) कुटूंबातील एकूण सभासद संख्या ______________

ब ) स्वत:चे घर आहे / नाही

क ) कुटूंबातील किती सदस्य प्रत्यक्ष कमावतात. संख्या. ________

4. ऑटो व्यवसाय किती वर्षांपासून करीत आहात ? वर्ष ________

5. ऑटो स्वत:च्या मालकीची आहे काय ? होय / नाही

अ ) असल्यास किती रुपयात खरेदी केली ? ...................... रुपये

ब ) खरेदीसाठी किती कर्ज काढले होते ? ...................... रुपये

क ) कर्ज बाकी आहे काय ? होय / नाही

किती ? ...................... रुपये

ड ) भाडयाची ऑटो असल्यास मासिक भाडे किती ? ...................... रुपये

6. ऑटो प्रतिलिटर किती ॲव्हरेज देते ? ...................... किलो मीटर

7. ऑटोतून प्रवासी परगावी नियमितपणे नेता काय ? होय / नाही

8. दररोजचे आपले काही बांधील ग्राहक दरमहा आहेत काय ? होय / नाही

9. आपल्या ऑटोत पुढीलपैकी कोणत्या सुविधा आहेत ? ( ✔ खुण करावी )

अ ) टेप ☐ ब ) आरामदायी सीट ☐ क ) पडदे ☐

ड ) शो लाईट ☐

Scanned with OKEN Scanner

10. ऑटो असोसिएशनचे सभासद आहात काय ? होय / नाही

11. असोसिएशनचा आपणास फायदा होतो काय ? होय / नाही

12. ऑटोचा विमा काढला आहे काय ? होय / नाही

13. ऑटोचे परमिट आहे काय ? होय / नाही

14 भाडे मिटर प्रमाणे घेता काय ? होय / नाही

15 लगेज जास्त असल्यास त्याचा स्वतंत्र चार्ज घेता काय ? होय / नाही

16. व्यवसायात प्रचंड स्पर्धा वाटते काय ? होय / नाही

17. आजारपण वा बाहेरगावी गेल्यास दुसऱ्याला भाडयाने ऑटो देता काय ?

होय / नाही

18. दिवसभरात साधारण किती तास व्यवसाय करता ? ...........तास

19. कोणत्या दिवसात व्यवसाय अधिक चालतो ? उन्हाळा / हिवाळा / पावसाळा

20. खर्च वजा जाता महिण्याला किती उत्पन्न मिळते? .............. रुपये

21. अ) सकाळी किती वाजता व्यवसाय सुरु करता ? .............. वाजता

ब ) रात्री किती वाजता व्यवसाय बंद करता ? .............. वाजता

22. फावल्या वेळेत आपण वर्तमानपत्र , मासिक , पुस्तके वाचता काय ?

होय / नाही

23. ग्राहकांशी तसेच व्यवसायातील इतरांशी हुज्जत होते काय ? होय / नाही

24. आपण नियमित बचत करता काय ? होय / नाही

25. मोठया शहरात जाऊन हा व्यवसाय करावासा वाटतो काय ? होय / नाही

Scanned with OKEN Scanner

26. हा व्यवसाय का निवडला ?

..........................................................................................

27 इतर व्यवसाय करावासा वाटतो काय ? होय / नाही

28. या व्यवसायात कोणत्या अडचणी आहेत ?

..................................................................

29. व्यवसायात कोणत्या सुधारणा कराव्या असे आपणाला वाटते ?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

**माहिती संकलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची सही** **चालकाची सही**

Scanned with OKEN Scanner